# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शुक्रवार, दिनांक १५ मार्च, २०१३.
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : म.वि.प.नियम ९३ अन्वये सूचना (असल्यास).**

**तीन : लक्षवेधी सूचना-(म.वि.प. नियम १०१ अन्वये) -**

(१) **श्रीमती विद्या चव्हाण वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

" मुंबईत कचरा वेचण्याच्या कामात खाजगी कंपन्या व ठेकेदारांची घुसखोरी वाढणे, डंपिंग ग्राउंडवर पूर्वापार कचरा वेचायला जाणाऱ्या महिलांना वारंवार धमकावणे, सुका कचरा - प्लॅस्टिक, काच, पत्रे अशा वस्तु आधीच लंपास करणे, यामुळे या महिलांच्या रोजीरोटीवर गदा येणे, परिणामी या महिलांपुढे उपजिवीकेचा प्रश्न उभा राहणे, मुंबईतील कचऱ्याचे वेचन करुन पर्यावरणाचे रक्षण करणाऱ्या या महिलांना शासनाचे कोणतेच सहकार्य नसणे, त्यांना आरोग्याबाबत कोणतीही सुविधा मिळत नसणे, या महिलांना शासनाकडून संरक्षण व त्यांना आरोग्य सुविधा देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

(२) **सर्वश्री. विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, ॲड. आशिष शेलार, श्री. रामनाथ मोते वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"वीज मीटर रीडिंगमधील फेरफारीला आळा घालण्यासाठी व राज्य भारनियमनमुक्तीचे उद्दिष्ट गाठण्यासाठी महावितरणने या रेडिओ फ्रिक्वेन्सी आणि इन्फ्रारेड मीटर्सचा पर्याय शोधून काढणे, मीटर्सची खरेदी करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे.फ्लॅश इलेक्ट्रॉनिक्स यांचे दर सर्वात कमी असतानाही त्यांना केवळ १ लाख मीटर्सचा पुरवठा करण्याचे आदेश देणे. जास्त दर असलेल्या मे.पालमोहन इलेक्ट्रॉनिक्स प्रा.लि., नवी दिल्ली व मे.रोलेक्स मीटर्स प्रा.लि., हैद्राबाद यांना ३.२ लक्ष मीटर्सचा पुरवठा करण्याचे आदेश देण्यात येणे, यामुळे महावितरणवर ४०५ लक्ष रुपयांचा

अतिरिक्त बोजा पडणे, प्रत्यक्षात निविदा काढताना कंत्राटदाराला त्याची पात्रता सिध्द केल्यानंतरच काम देण्याची आवश्यकता असताना या बाबीकडे दुर्लक्ष करुन नवीन कंपनीला काम देताना पूर्ण देऊ नये असा वित्त व लेखा संहितेस धरुन नसणारा नियम काढण्यात येणे, मे.पालमोहन इलेक्टॉनिक्स लिमिटेड व मे.रोलेक्स मिटर्स प्रा.लिमिटेड यांनी महावितरणाला पुरविलेल्या मिटर्सबाबत राज्यभरातील वीजधारकांकडून मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त होणे, यात बऱ्याच ठिकाणी वीजेचे बिल शुन्य रुपये तर काही ठिकाणी ४० हजार रुपयांचे मासिक देयक जनतेला प्राप्त होत असणाऱ्या तक्रारीचा समावेश असणे, याबाबत शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्रीमती अलका देसाई, सर्वश्री. सुभाष चव्हाण, संजय दत्त, किरण पावसकर, जयवंतराव जाधव, अनिल भोसले, डॉ. निलम गोऱ्हे, सर्वश्री. विनायक राऊत, चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे, राणा जगजितसिंह पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. विजय गिरकर, हेमंत टकले, विनायक राऊत वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृह मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"दिनांक २५ फेब्रुवारी, २०१३ रोजी नवी मुंबईतील खारघर मधील ओवे गावात बांगलादेशीयांना पकडण्यासाठी गेलेल्या सीआयडीच्या पथकावर १० ते २० जणांच्या जमावाने लोखंडी सळ्या आणि लाठ्या-काठ्यांनी हल्ला करण्याची घटना घडणे, मुंबई पुणेसह इतर महत्त्वाच्या शहरामध्ये दहशतवादी हल्ले घडविण्याची शक्यता असण्याचा अहवाल केंद्रीय गुप्तचर विभागाला मिळणे, राज्यातील गडचिरोली, गोंदिया जिल्ह्यात चिनी प्रवाशांची तसेच कोकणातील रायगड जिल्ह्यात कोरीयन नागरिकांची संख्या वाढत असून राज्यात अशाप्रकारे वाढलेल्या चिनी, कोरियन, पाकिस्तानी, बांगलादेशी व अफगाणिस्तानी नागरिकांच्या संख्येमुळे सुरक्षेचा प्रश्न निर्माण होणे या नागरिकाची तातडीने चौकशी करुन त्यांना आपल्या मायदेशी पाठवण्याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही."

(४) **डॉ. नीलम गोऱ्हे वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अल्पसंख्याक विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यभरात वक्फ बोर्डाच्या मालकीच्या एकूण जागेपैकी ६० टक्के जागेवर विविध

संस्था संघटना व व्यक्तींनी बेकायदेशीरपणे अतिक्रमण, केले असून त्यापैकी विविध ८२ ठिकाणच्या सुमारे ८० एकर जागा विविध सरकारी व निमसरकारी कार्यालयांनी बळकावल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१३ च्या सुमारास निदर्शनास येणे, या अतिक्रमण केलेल्या ८२ ठिकाणच्या सरकारी व निमसरकारी कार्यालयात औरंगाबादमधील जिल्हाधिकारी व मुख्यमंत्री कार्यालयाचा समावेश असणे, तसेच या जागेचे भाडेही त्यांनी न भरल्याने वक्फ बोर्डाच्या कायदयानुसार भाडे भरण्याबाबत बजावण्यात आलेल्या नोटीसा, या सरकारी कार्यालयाकडून जागेच्या भाडयाची वसूली करण्याबाबत व सदरची वक्फ बोर्डाची जागा त्यांना परत देण्याबाबत शासनाने केलेली कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(५) **श्री. जयंत पाटील वि.प.स.**पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मत्स्यव्यवसाय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

" अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील थळ येथील आर.सी.एफ. कंपनीच्या सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी खोल समुद्रात कंपनी अस्तित्वात आल्यापासून पाईपलाईन कार्यान्वित असणे, सदर पाईपलाईनची कंपनीमार्फत निगा न राखल्याने पाईप लाईन पाण्यावर येणे, मच्छिमार करणाऱ्या मच्छिमारांच्या बोटींना पाण्यावर आलेल्या या पाईपलाईनमुळे अडथळा निर्माण होणे, मच्छिमार बोटींचे सातत्याने नुकसान होणे, या संदर्भात अनेक वेळा लोकप्रतिनिधी तसेच ग्रामपंचायती मार्फत आर.सी.एफ. प्रशासनासमवेत झालेल्या चर्चेत कंपनीच्या प्रशासनाने आश्वासन देऊनही दुरुस्तीबाबत तसेच पाईप लाईन पाण्याखाली ठेवण्याच्या दृष्टीने कोणतीही कारवाई करण्यास या प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष, बोटीचे नुकसान होत असल्याने आर.सी.एफ. प्रशासनाकडून स्वखर्चाने पर्यायी जेट्टी बांधून मिळणेबाबत स्थानिक कोळी बांधवांनी निवेदन देणे, सभागृहात चर्चा केल्यानुसार शासनाच्या विभागाने प्रत्यक्ष केलेल्या पाहाणीनुसार खडकवासला संशोधन केंद्राकडून पाईपलाईन बदलण्यात आली नाही तर या परिसरात स्फोट होण्याची शक्यता वर्तविण्यात येणे, या गंभीर समस्येबाबत कोणतीही कारवाई होत नसल्याने, कोळी बांधवांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया."

**चार** : **विशेष उल्लेख (असल्यास)- (म.वि.प. नियम १०१-अ अन्वये).**

# मध्यंतर

**पाच : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस).**

**सहा : (गुरुवार, दिनांक १४ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला परंतु पुढे ढकलण्यात आलेला प्रस्ताव ) -**

**सर्वश्री. विनोद तावडे,** दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, चंद्रकांत पाटील, डॉ.दिपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री.रामनाथ मोते, सुमंतराव गायकवाड, ॲड.आशिष शेलार, ॲड. अनिल परब, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री.नागो गाणार, भगवान साळुंखे **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

" वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या संघटनांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी परिक्षेच्या कामावर बहिष्कार टाकला असणे, वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना ५ वा वेतन आयोग दिनांक १ जानेवारी, १९९६ पासून लागू करणे, विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिल्याप्रमाणे राज्य शासनाने दिनांक १ जानेवारी, २००६ ते ३१ मार्च, २०१० या कालावधीतील ६ व्या वेतन आयोगाची ८० टक्के थकबाकी न देणे, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे शिक्षकांना महागाई भत्ता न देणे, शिक्षकेत्तरांच्या आकृतीबंधाचा विषय गेली १३ वर्षे प्रलंबित असणे, कायम विना अनुदानित शाळांचा शब्द काढून टाकताना उच्च माध्यमिक शाळांना जाणीवपूर्वक वगळणे, दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ च्या मुल्यांकनाच्या निकषामध्ये बदल करण्याचे मान्य करुनही कारवाई न होणे, दिनांक २८ नोव्हेंबर, २००६ च्या विना अनुदानित सेवा कालावधी वरिष्ठ निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरण्याच्या निर्णयातून प्राथमिक, उच्च माध्यमिक शिक्षक व सर्व शिक्षकेत्तरांना वगळणे, राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षकांना देय वेतनवाढी ४ वर्षापासून बंद करणे, शिक्षकेत्तरांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू न करणे, वेतनेत्तर अनुदानाची मागील ८ वर्षांची थकबाकी नाकारणे, पटपडताळणीच्या अनुषंगाने बंद पडणाऱ्या शाळांमधील शिक्षक-शिक्षकेत्तरांना संरक्षण व समायोजन नाकारणे, गुणवत्तेच्या नावाखाली सेवेत असलेल्या इयत्ता ६ वी ते ८ वी च्या शिक्षकांसाठी पदवी प्राप्त करण्याची सक्ती करणे, विना अनुदानित शाळांचे मुल्यांकनाचे जाचक निकष शिथील करण्याचे आश्वासन देऊनही शासनाने कारवाई न करणे, विना अनुदानित शाळेत सेवेत असलेले सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवा संरक्षण न देणे, परिणामी विना अनुदानित शाळेच्या

शिक्षकांनी आत्मदहनाचा इशारा देणे, वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांचा परिक्षेच्या कामकाजावर बहिष्कार जाहीर केल्यामुळे राज्यातील विद्यार्थी व पालक यांच्यामध्ये शासनाविषयी नाराजी निर्माण होणे, विद्यार्थी हिताचा विचार न करता शासनाने या विषयाकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी विद्यार्थी व पालक यांचेवर प्रचंड ताण व तणाव निर्माण होणे, राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या व विना अनुदानित शाळेमधील शिक्षकांच्या उक्त मागण्यांच्याबाबतीत तोडगा काढण्यास शासनास आलेले अपयश, शासनाने या प्रकरणी तातडीने करावयाची उपाययोजना व याबाबतची शासनाची भूमिका विचारात घेण्यात यावी. "

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १४ मार्च, २०१३.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.